भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ०५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०१/२०१८

१) मोटार सायकलची चोरी . :–

दिनांक ०२/०१/२०१८ चे ००.०१ ते ०१.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादरी सागर राजेंन्द सेलोकर वय २४ वर्ष, रा. इंदुरखा याने त्याची मोटार सायकल हिरो होंडा स्प्लेंन्डर क्र. एम एच ३६/पी ७०२४ किंमती २५,०००/–रु. ची ही डांबरी रोडच्या बाजुला ऊभी ठेवुन व हॅन्डल लॉक करुन जलसा मधील नाटकाचा कार्यक्रम पाहण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. संतापे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

२) क्षुल्लक कारणावरुन लोखंडी सब्बलने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . . :–

दिनांक ०२/०१/२०१८ चे ०८.४५ यातील जखमी फिर्यादी हा मासोळी मारण्याचे पैसे घेण्यास वामन चाचेरे यांचे घरी जात असता यातील आरोपीने फिर्यादीस 'तु मला शिवीगाळ कशाला केलास' असे म्हणुन लोखंडी सब्बलने जखमी फिर्यादीचे डावे मोंडयावर, डावे फसलीवर, व उजवे पायाचे पोटरी जवळ मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

३) शेतातील मोटार पंपची चोरी :–

दिनांक ०१/०१/२०१८ ते ०२/०१/२०१८ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी भावुराव पोटु देशमुख वय ६५ वर्ष, रा. दिघोरी याचे शेतामधील फिल्टरला लावलेली सी.आर.आय.कंपनीची मोटार पंप दिड एचपी किंमती ७,४४०/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे स्वत: व पायी जाणाऱ्या इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील जखमी विनायक पाल गांवडे हा पायी जात असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार वर डब्बलसिट भरधाव वेगाने, लापरवाहीने चालवुन जखमीस दवडीपार बाजार शिवार आय. टी. आय. बस स्थानक येथे धडक मारुन जखमी केल्याने व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी दिलीप पांडुरंग तायडे वय ५० वर्ष, रा. हिंगणा/ उमरा जि. बुलढाणा ह.मु. दवडीपार बाजार यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४/ १७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५)खुल्या दारातुन प्रवेश करुन लॅपटॉप बॅगमधुन लॅपटॉप नगदी पैसे, बॅकेचा चेक चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे १०.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी जितेन्द्र गुलाबचंद शर्मा वय ३६ वर्ष रा. गुरुनानक वार्ड तुमसर हा दुकानाचे शर्टस खोलुन कांऊटरचे साईडला असलेल्या खुर्चीवर लॅपटॉप बॅग ठेवुन दुसऱ्या साईडचा शटर्स खोलण्यास गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने खुल्या दारातुन प्रवेश करुन लॅपटॉप बॅग ज्यात ०१ एच पी कंपनीचा लॅपटॉप किंमती २७,७००/–रु. नगदी ४,०००/–रु. एस.बी.आय बॅकेचा ०१ चेक ज्यावर ८,९९०/–रु. लिहीलेली व बॅक ऑफ बदोडा चा ०१ चेक ज्यावर २,३१८/–रु. लिहीलेले असा एकुण ३१,७००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन काठीने डोक्यावर मारुन ओंढतान करुन कान चिरुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०१/२०१८ चे ०७.०० यातील जखमी फिर्यादी ही स्वयंपाक खोलीत हजर असतांनी शौचास जातात व पाणी टाकीत नाही वास येतो असे बोलत असतांनी आरोपी क्र. १ व २ नी संगनमत करुन स्वयंपाक खोलीत प्रवेश करुन आरोपी क्र. ०२ हीने डोक्याचे केस पकडुन लाथा बुक्यांनी मारपीट केले व आरोपी क्र. ०१ हयाने हातात काठी घेवुन फिर्यादीचे डोक्यावर मारुन व ओढतान केल्याने उजव्या बाजुचे कान चिरुन रक्त निघाल्याने व जखमी करुन तसेच शिवीगाळ व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,४५२,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

७) अवैध दारु/ जुगार अड्डयांवर धाडी .   :—

दिनांक ०२/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, पवनी व लाखांदुर येथे अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०६ लिटर हातभट्टी दारू किंमती ६००/—रु. तसेच ४ लिटर १४० मिली लिटर देशी/विदेशी दारु किंमती १५४०/—रु. तसेच जुगारातुन किंमती ७९४/—रु. असा एकुण २,९३४/रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा**
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.